पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव,सोलापूर-४१३२५५,महाराष्ट्र(भारत)
दुरध्वनीक्र.०२१७-२७४४७७१/७२/७३/७४(११ लाईस),फॅक्स:०२१७-२३५१३००
संकेतस्थळ:http://sus.ac.in,ई-मेल:affiliation@sus.ac.in

[संलग्नता विभाग]

जावक क्र.: पुअहोसोविसो/संलग्नता/२०२५-२६/ 5245 दिनांक 4 JUL 2025

प्रति,
(०१) मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
(०२) मा. संचालक, सर्व संकुले
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ परिसर,
सोलापूर.

विषय : **शासकीय/निमशासकीय कार्यालयात/विभागीय/जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय शासन संचलित सर्व शिक्षण संस्था यामध्ये कोणत्याही धर्माच्या धार्मिक विधी, सण, उत्सव इ. बाबत कार्यालयीन इमारतीच्या भिंतीवर धार्मिक घोष वाक्य लिहिणे, धार्मिक फोटो लावणे भारतीय संविधानानुसार चुकीचा आहे, हे बंद करुन धार्मिक फोटो कार्यालयातून सन्मानाने काढून घेण्याबात....**

संदर्भ : १)महाराष्ट्र शासनाचे दि. ०४ जानेवारी २०१७ रोजीचे पत्र
२)अधिसभेच्या दि.११ मार्च २०२५ व दि. १२ मार्च २०२५ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.२०
३) व्यवस्थापन परिषदेच्या दि. ०३ जून २०२५ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.१३

महोदय/महोदया,

संदर्भ क्र. १ च्या अनुषंगाने दि.११ मार्च २०२५ व दि. १२ मार्च २०२५ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्र. २० अन्व्ये शासनाच्या वरील पत्राची प्रभावीपणे अमंलबजावणी होणे कामी व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली होती.

सदर शिफारशीच्या अनुरोधाने दि.०३ जून २०२५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत भारतीय घटनेच्या मूलभूत तत्वानुसार शासकीय/निमशासकीय कार्यालयात/विभागीय/जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय शासन संचलित सर्व शिक्षण संस्था यामध्ये कोणत्याही धर्माच्या धार्मिक विधी, सण, उत्सव इमारतीच्या भिंतीवर धार्मिक घोष वाक्य लिहिणे, धार्मिक फोटो लावणे या भारतीय संविधानानुसार निषिध्द व चुकीचे आहे.

(कृपया मागे पहा)

तरी आपल्या शिक्षण संस्थेत/महाविद्यालयात/प्रशासकीय विभागात इमारतीच्या भिंतीवर धार्मिक घोष वाक्य लिहिणे बंद करण्यात यावेत आणि इमारतीच्या भिंतीवर धार्मिक फोटो लावले असल्यास ते फोटो सन्मानाने काढूण घेण्यात यावेत तसेच शासकीय/निमशासकीय परिसरात कोणताही धार्मिक विधी, सण साजरा करु नये.

कृपया सदर पत्राची आपल्या स्तरावरुन तात्काळ प्रभावीपणे अमंलबजावणी करण्यात यावी.

आदेशावरुन/-

(डॉ. यु. व्ही. मेटकरी)
उपकुलसचिव